In the present, in higher education system, government has been increasing the number of higher education institute but quality of education has been decreasing day by day. In both colleges and universities the traditional courses are still running and the employment opportunities after completing these courses are very low. India's higher education system is the world's third largest in terms of students, next to China and the United States. China educates approximately 20 per cent of its youth in higher education where as India educates 11 per cent of its youth in higher education. University Grants Commission in India enforces its standards, advises the government, and helps to coordinate between the centre and the state. Some Indian institutions have established their own standard at global level. Indian Institutes of technology (IITs) is one of them which have been globally recognized for its standard and quality education. Annually, the IITs enroll about 8000 students and the alumni have contributed not only to the growth of the private sector but also the public sectors of India. But still India has been struggling to create world class universities like Harvard and Cambridge.

IMPACT 5.131 Iijif FACTOR

Indexed

₹ 400/-

18-19 (18)

5

February 2018 E-ISSN: 2321-4953

# IRFA's UNIRESEARCH

Multidisciplinary International ... Research Journal

Vol. X

*Indexed in DRJI & Indian Citation Index* *Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005 *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

UNIRESEARCH

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 10 Issue. 2
ISSN 2321-4953 (Online)
February - 2018

# INDEX


| No. | Title of the paper | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 'A Study of Quality Management Practices Adopted by Manufacturing Industries' | - **Dr. Mahesh Auti** | 04 |
| 2 | A Study of Startup Initiatives in India | - **Dr. Ganesh Patare & Sakshi Chordiya** | 10 |
| 3 | Analyzing Rainfall Variability of India in Climate Change Scenario | - **Rajendra P. Gunjal** | 17 |
| 4 | Pollution Studies on Sugar Factory Effluent- Physico-Chemical Characteristics And Toxic Metals | - **Mr. Govind Panchal & Mr. Sambhaji Kabadi** | 21 |
| 5 | Drug Trafficking as an Offence in India | - **Dr. Monika Negi** | 27 |
| 6 | Benefits and Problem of Beneficiaries of Indira Gandhi old age Pension Scheme in Khed Tahasil | - **Dr. Manohar Sanap & Mr. Maruti Kekane** | 32 |
| 7 | Development and Inequality In the Era of Globalization | -**Dr. Maroti Tegampure** | 39 |
| 8 | *Social competence among school going children: A study of effect of social work intervention on social competence with special reference to residential institute* | **Mr. Umesh Bagal & Dr. Geeta Joshi** | 42 |
| 9 | TQM vis a vis user Satisfaction a Reference of A.D.College Library : A Case Study | - **Mr.Balaji A.Kamble** | 57 |
| 10 | The Postcolonial Study of Ruth Prawer Jhabvala's *Esmond in India* | - **Lakhan Gaidhane & Dr. Dilip Jena** | 64 |
| 11 | *Phenomenon of Metamorphosis in Khushwant Singh's 'Train to Pakistan'* | - **Prof. Pankaj Dindokar** | 68 |
| 12 | Literary Contribution of (Hon.) Yashwantrao Chavan | - **Smt. Urmila N.Kshirsagar** | 72 |
| 13 | Indian Women in Present Scenario | - **Makarand Joshi** | 76 |
| 14 | 'गोंधळ' लोकनाट्य : एक दृष्टीक्षेप | - **डॉ. शरद मेश्राम** | 79 |
| 15 | संत ज्ञानेश्वरांचे धार्मिक व सामाजिक कार्य | - **प्रा. गोपाल ढोले** | 86 |
| 16 | गो.वि.करंदीकरांचे गद्य लेखन | - **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 90 |
| 17 | जागतिकीकरण आणि मराठी कवितेची भाषा | – **डॉ. दिलीप पवार** | 95 |
| 18 | जागतिकीकरण : समाज व संस्कृती | - **डॉ. पुरुषोत्तम जुन्ने** | 100 |
| 19 | १९९० नंतरच्या मराठी कवितेतील प्रतिमा दर्शन | – **डॉ. सुरेश जाधव** | 106 |
| 20 | एलकुंचवारांच्या 'आत्मकथा' या नाटकाचा निर्मितीच्या अंगाने विचार | - **डॉ. निशा जोशी** | 109 |
| 21 | ग्रामीण युवकांच्या जीवनस्पंदनाचा आलेख : 'झोंबी' | - **डॉ. भाऊसाहेब गमे** | 113 |
| 22 | वसंत आबाजी डहाके : व्यक्ती आणि वाङ्मय | - **सदाशिव शिंदे** | 116 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | गोर संवेदना अभिव्यक्त करणारा लेखक : रावजी राठोड | - प्रा. व्ही. बी. राठोड | 124 |
| 24 | ग्रामीण कथाकार व्यंकटेश माडगुळकर | - सुनिता मोटे | 129 |
| 25 | मला उध्वस्त व्हायचंय : एक चिंतन | - प्रा. अनिता वाळके | 134 |
| 26 | 'नाच ग घुमा' मधील स्त्री चित्रण | - कविता पाटील व डॉ. मनीषा नेसरकर | 137 |
| 27 | वैदिक जीवन व्यवस्थापन | - प्रा. संजीवनी नेरकर | 142 |
| 28 | स्त्रिया आणि शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाच्या प्रणेत्या : ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले | – डॉ. अनिल पवार | 147 |
| 29 | महात्मा गांधींचे स्त्री सबलीकरण विषयक विचार | - डॉ. आर. बी. शेटे | 151 |
| 30 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्री विषयक विचार | - प्रा. नेमीचंद चव्हाण | 155 |
| 31 | भारतातील स्त्री हिंसा आणि मानवी हक्क | - श्रीमती सुप्रिया देसाई | 163 |
| 32 | सम्राट अशोकाचा धम्म व आधुनिक इतिहासातील योगदान | - सुनिता पाटील | 166 |
| 33 | भारतातील बौद्ध स्तूप : एक चिकित्सक अभ्यास | - प्रा. लता आंदे | 170 |
| 34 | स्वतंत्र भारतातील समाज वादाचे स्वरूप | - प्रा. रजनी बोबडे | 176 |
| 35 | भारतीय समाजातील कुपोषणाची सद्य स्थिती | - डॉ. विलास चव्हाण | 180 |
| 36 | शासनाची मनोधैर्य योजना : एक समाज शास्त्रीय विश्लेषण | - प्रा. जगदीश ससाणे | 184 |
| 37 | महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक सुधारणा | - हणमंत पचलिंग | 189 |
| 38 | जल-व्यवस्थापन : एक अध्ययन | - डॉ. सुरेश बन्सपाल | 192 |
| 39 | डी स्पेस प्रणाली आधुनिक पद्धतीने माहिती संग्रहण : जतन आणि प्रतीप्राप्ती करण्यास उपयोगी | प्रा. हितेश ब्रिजवासी व प्रा. दीपक घुगे | 195 |
| 40 | २१ वे शतकातील शैक्षणिक ग्रंथालयासाठी विपणन एक वरदान | – श्रीमती प्रीती पाटील | 201 |
| 41 | वाचक व त्यांच्या वाचन सवयी व बदलते ग्रंथालय | - श्री. अनिकेत वारूळकर | 209 |
| 42 | 'गोदान' में महानगरीय और ग्रामीण जीवन कि यथार्थ प्रासंगिकता | – प्रा. शांताराम वळवी | 216 |
| 43 | गोर बंजारा रामाज कि मान्यतायें | – डॉ. दत्ता जाधव | 221 |
| 44 | थर्ड जेंडर विमर्श ' और हिंदी नाटक | - डॉ. भानुदास आगेडकर | 226 |
| 45 | हिंदी साहित्य में दलित विमर्श | – नयन भादुले -राजमाने | 232 |
| 46 | नेबसाईट : स्वरूप एवं संकल्पना | - डॉ. दीपक तुपे | 235 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor-**

'Uniresearch' - International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 10 Issue. 2 | February - 2018

# जागतिकीकरण आणि मराठी कवितेची भाषा

**प्रा. डॉ. दिलीप पी.पवार**
समन्वयक व मराठी विभागप्रमुख,
मराठी संशोधन केंद्र,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक
४२२००२ (महाराष्ट्र)

एकविसावे शतक अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जाते. म्हणूनच २१ व्या शतकाची ओळख निरनिराळ्या शब्दांनी, संज्ञेने करून दिली जाते. मात्र बहुतांश अभ्यासशाखा 'जागतिकीकरण' या संज्ञेनेच आजच्या युगाला ओळख देतात. यामुळेच जागतिकीकरण हा आजच्या काळातील परवलीचा शब्द बनला आहे. भारतात १९९० नंतर या प्रक्रियेचा नाईलाजास्तव व अगतिकतेने स्वीकार केल्याचे दिसून येते. त्यामुळे अप्रत्यक्ष १९९० पूर्वीची मिश्र अर्थव्यवस्था, लोककल्याणकारी राज्यव्यवस्था या बाबींना नकार दिला गेला. या व इतर अनेक बाबींमुळे जागतिकीकरणासंबंधी अनेक विद्वानांत मत-मतांतरे दिसून येतात. यामध्ये जागतिकीकरणाचे स्वागत करणा-या मुक्त अर्थव्यवस्थेत 'गुणवत्ते'ला स्थान असते वा मिळते असे सांगतात तर जागतिकीकरणाला विरोध असणारे जागतिकीकरण हे नव वसाहतवादी शोषण व्यवस्थेचे नवे रूप आहे असे सांगतात. जागतिकीकरणाच्या संदर्भात अनेक व्याख्या, ग्रंथ आज उपलब्ध आहेत. जागतिकीकरण म्हणजेच बाजारकेंद्री अर्थव्यवस्था होय. अर्थातच ही संकल्पना खुल्या व्यापार-उदिमांशी संबंधित आहे. या बाबी व धोरणाच्या स्वीकारानंतर साहजिकच खाजगीकरण, उदारीकरण या छुप्या धोरणांचाही अवलंब केला गेल्याचे दिसून येते व याच धोरणांच्या परिणामामुळे आज जागतिकीकरणाला विरोध केला जातो.

गेल्या काही महिन्यांपूर्वी भारतभरात जागतिकीकरणाला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कौतुकास्पद बाब गृहित धरून भारतात एक प्रकारचा 'विजयोत्सव' साजरा केला गेला. खरं तर गेल्या २५ वर्षांमधील दृश्य परिणाम व अनुभव हे अत्यंत दाहक असेच आहेत. भारतातील कृषी व्यवस्थेला, कृषीकर्त्याला हा मोठा परिणाम दिसून येतो. शेतकरी आत्महत्या, बेकारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. या बाबी संपूर्ण समाजाला चिंता व चिंतन करायला लावणा-या अशाच आहेत. एकूणच जागतिकीकरणाची व्यवस्था ही अर्थकेंद्री मानली जाते व अर्थ ही बाब संपूर्ण मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असल्याने मानवी जीवनाचा विविध क्षेत्रांवर, मूल्यव्यवस्थेवर देखील जागतिकीकरणाचा प्रभाव दिसून येतो. मानवी समाजजीवनाच्या विविध अंगावर हा परिणाम दिसून आल्याने साहिजिक मानवी आविष्कारणाच्या विविध कलांवरती देखील हा प्रभाव दिसून येतो. हा प्रभाव १९९० नंतरच्या मराठी भाषा व साहित्याच्या अनुषंगाने संदर्भासहीत मांडता, शोधता येतो हीच बाब गृहित ठेवून १९९० नंतरच्या मराठी कविता व तिची भाषाशैली यासंदर्भात शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

'भाषा'ही मानवी अस्तित्वाला व्यापणारी बाब आहे. मानवी जीवनाच्या बदलत्या संदर्भाची, जीवनाची भाषेच्या आधारे स्थित्यंतरे शोधता येऊ शकतात. याचे ठळक कारण म्हणजे प्रत्येक काळात त्या-त्या समाजाचे विचार, भावना, संवेदना अभिव्यक्तीचे मुख्य साधन भाषा हीच असते व ही बाब ध्यानात ठेऊनच जागतिकीकरण व मराठी भाषा, साहित्य या बाबींचे विश्लेषण अधिक हितावह ठरते. मुख्यतः कवितेच्या बाबतीत विश्लेषण करीत असताना काही बाबी स्पष्ट कराव्या लागतात जशा की,

१. काव्य व कविता यामध्ये मूलतः भेद आहे.

२. काव्य हे भाषेचे एक रूप आहे व काव्यात्मकता हा तिचा गुणधर्म असतो.

३. कवीची रचना कलात्मक स्वरूपाची असली तरी संबंधित स्थल, काल व पर्यावरणाशी निगडीत असते व म्हणूनच व्यापक अर्थाने कविता ही मानवी जीवन, मानवी जगणे व मानवी अनुभव यांच्या संबंधित अशी बाब ठरते. या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरण आणि मराठी कवितेची भाषा यासंबंधी शोध घेण्याचा प्रयत्न सदर लेखात केला आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात आधुनिक प्रसारमाध्यमे, तंत्रसाधने व संदर्भ यांचा समाजभाषेवर प्रभाव पडल्याचे आढळून येते. कम्प्युटर, मोबाईल, टेलिव्हिजन, सोशल मीडिया, चित्रपट व मुक्त अर्थव्यवस्थेच्या परिणामातून निर्माण झालेली भाषिक संमिश्रता यामुळे मानवी जीवनाला नवा संदर्भ लाभल्याचे दिसून येते.

कवितेची भाषा हा एक महत्त्वाचा घटक आहे. इतर साहित्यप्रकारांपेक्षा कवितेतील भाषा, ही बाब अधिक वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची दिसून येते.

"केवळ स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम,
उद्‌गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह
किती कठीण झालेलं आहे आता
शब्दांपुढे शब्द मांडून
जुळवणे एखादं वाक्य वचन"

( चित्रलिपी : पृ.३१)

कवी कवितेच्या माध्यमातून चित्रण करताना केवळ दृश्य चित्रण, वास्तव रेखाटन करीत नसतो. तर कवितेच्या विविधांगी घटकाच्या माध्यमातून कवी वाचकांस कलात्मक, सूचक अशा पर्यावरणाची जाणीव करून देत असतो. ज्याप्रमाणे जागतिकीकरणाच्या रेट्यात मानवी जीवनाला एका कोलाहलाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे .या कोलाहलातील ही संभ्रमावस्था कविवर्य वसंत आबाजी डहाके उपरोक्त काव्यरचनेतून मांडताना दिसतात. अशाप्रकारची संभ्रमावस्था कवितेच्या माध्यमातून भाषिक पातळीवर नव्वदोत्तरी अनेक कविंनी मांडलेली दिसून येते.

"माझे माझ्यासाठी, तुझे तुझ्यासाठी
आपले आपल्यासाठी, त्याचे त्याच्यासाठी
मी, तू , ते आणि ते सुद्धा
येत नाहीत कधीसाठी"

(रिसायक्लींगची वेळ झालीय, पृ. ४५)

कवी मोहन बोरसे यांची ही रचना सूक्ष्मरित्या जागतिकीकरणाचे संदर्भ, शाब्दिक आवृत्तीच्या द्वारे सूचित करतात. एकूणच मानवी जीवनातील विरोधात्मकता चाणाक्षरित्या विशद करतात. याच त-हेची जाणीव प्रवीण बांदेकर, राम दोतोंडे यांच्या कवितांमधून अनुभवयाला मिळते.

**मुक्तछंद**

जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतरच्या मराठीतील अनेक कवींच्या कविता मुख्यतः मुक्तछंदात लिहिलेल्या दिसून येतात. अभिव्यक्ती वा आविष्कार स्वातंत्र्य ध्यानात ठेऊन गद्यप्राय स्वरूपाच्या कविता सुद्धा लिहिल्या गेल्याचे दिसून येते. जागतिकीकरणानंतर जन्माला आलेली ही गद्यप्राय स्वरूपाची कविता वाक्यच्या वाक्ये मांडत जाताना दिसते. कुठल्याही चिन्हांचा वापर न करता फक्त शब्दांची आणि वर्णाची पुनरावृत्ती करत नवी कविता प्रयोगशीलतेच्या अंगाने जाताना दिसते. गद्य आणि पद्य यामधील रेषा पुसटशी होताना दिसते. गद्य

ही जरी अभिव्यक्ती असली तरी अनुभूती मात्र काव्यात्म स्वरूपाची आहे. १९९० नंतर कवितेत जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या परिवर्तनाचे चित्रण करताना ही कविता मार्मिकता, निरीक्षणशक्ती, सूचकता, संदर्भता, प्रतिभा, प्रतिमेसह अभिव्यक्त होते. यामध्ये विशेषतः 'तृतीय पुरुषाचे आगमन' या दीर्घकवितासंग्रहाचे उदाहरण प्रातिनिधिक स्वरूपाचे ठरते.

प्रज्ञा दया पवार यांची विठाबाई नारायणगावकर यांच्या संदर्भातील 'आरपार लयीत प्राणांतिक', अरुण काळे यांची 'ग्लोबल गावकुस', मंगेश काळे यांची 'नाळ तुटल्या प्रथम पुरुषाचे दृष्टान्त' यासारख्या प्रातिनिधिक कवितांमधून संबंधित कविंनी त्या-त्या कवितेतील शब्दांच्या पुनरावृत्तीतून आशयाला अनुभवाची व्यापकता व अनेकार्थता दिल्याचे दिसून येते. याच धर्तीवर संतोष पवार यांच्या कवितेतील उदाहरण अभ्यासण्याजोगे आहे.

"मालक अशा मालकावर लादतात ओझी अशा रीतिने की
कणाकणाने जावा त्यांचा कणा संपून
मालक लालीलाल होत जातात,
अशा मालकांच्या जीवावर जसें टम्म फुगावेत ढेकूण लालेलाल,
इवल्याशा बाळाला चावून "

भारतामध्ये कुठल्याही गोष्टीचे किंवा येणा-या प्रश्न किंवा समस्येचे उत्तर लगेचच कधी मिळत नाही. प्रत्येक विभागात 'येथे चौकशी करा' ही पाटी वाचावयास मिळते. त्याला कवी तरी कसे अपवाद असतील. कवितेमध्ये कवीचे भाषिक भान प्रखरतेने प्रकट होते. भाषिक नियमोल्लंघन, शब्दाच्या क्रमातील बदल, भाषिक सरमिसळ, भाषिक करामती, भाषिक कसरती, सरळ भाषेचे चिंतन, दैनंदिन बोलीचे उपयोजन, माध्यमांतील भाषिक उपयोजनातील नक्कल व उपरोधिक वापर, बोलण्यासारखे भाषा उपयोजन इत्यादी वैशिष्ट्य या समकालीन कवितेच्या अभिव्यक्तीमध्ये दिसून येते. जागतिकीकरणाचे चित्रण करणारे महानगरीय कवी या निशेषाकडे वळलेले दिसतात.

**बाळबोध भाषा**

जागतिकीकरणाचे चित्रण करताना कवी ज्याप्रमाणे अनेक समूहांच्या/ विशिष्ट लोकसमूहाच्या प्रमाणभाषा किंवा बोली भाषेमध्ये बोलत असतो, त्याप्रमाणे एखाद्याला साधी, सोपी भाषा शिकवण्यासाठी अक्षरओळख किंवा वाक्य ओळख होण्यासाठी जी भाषा वापरतो, अशी सुलभ, लहानग्यासाठी असणारी बाळबोध भाषाही वापरताना दिसतो. या अनुषंगाने कवी दिलीप चित्रे आणि अरुण कोलटकर यांच्या कवितेतील आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबत सारखेपणा जाणवतो. कवी अरुण काळे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मामध्ये झालेल्या धार्मिक द्वेषाची नामनिर्देशनातून निर्माण होणारी तेढ सहज व बाळबोध भाषेत टिपतात.

"कमल महाआरती कर
रझिया महानमाज पढ
गौतम पाटलाच्या घरी जा
गाईला गवत घाल
डेव्हिड कबुतर उडव
करीम मंदिर बघून ठेव
छगन मशिद बघून ठेव" (अरूण काळे : सायरनचे शहर)

बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर समाजामध्ये जी जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण झाली तिचे कवी वर्णन करतो.

**इंग्रजी भाषा**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून झालेल्या घडामोडीतून, अस्थिरतेतून, कोलाहलातून, बदलातून जन्माला आलेली भाषा ही सर्वसमावेशक असून तिला स्वतःचा एक चेहरा आहे. जगण्यातील व्यामिश्रता सूचित करणारे अर्थवाही परिणाम जागतिकीकरणाचे चित्रण करणा-या कविताना लाभलेले दिसते.

कवी संजीव खांडेकर यांच्या 'ऑल दॅट आय वॉन्ना डू' : 'All that I wanna do' या कवितासंग्रहात त्यांनी कुबड्यावर एकूणच वर्तमानातील वास्तव नव्या मिथकाच्या रूपात सादर केले आहे. ही जागतिकीकरणातील कविता इंग्रजी वाक्यांनी आणि शब्दांनी खच्चून भरलेली आहे.

**हिंदी भाषा**

जागतिकीकरणाच्या काळात जी कविता निर्माण झाली ती व्यवहारात वापरल्या गेलेल्या वाक्याशी जवळिक साधणारी आहे. महानगरीय जीवनात तरी इंग्रजी भाषेनंतर हिंदी भाषेचा वापर केलेला दिसतो. दंगलीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचे चित्रण करताना कवी लिहितात,

"पक्क्या बंद कर दारे, खिडक्या
ओळखीच्या आवाजालाही देऊ नको
प्रतिसाद. कोई मर्द नहीं होगा आज घर में
दिवार की आड से बात करना भाभी से
बीच बीच में मैं सुबह ही आऊंगा घर पर
इद-ए-मिलाद आहे ना आज"

(रवींद्र चावरेकर : ग्लोबलोपनिषद : पृ. ३)

कवी हेमंत दिवटे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपल्या मालाची जी जाहिरात केलेली आहे, ती मानवी मन व्यापून टाकते आहे. इच्छा असो अगर नसो, ती वस्तू तुम्हाला देण्याचा जाहिरातदार प्रयत्न करतात.

**जाहिरातीतील भाषा**

विधानाच्या भाषेत बोलणारी जाहिरातीची भाषा वाचकाला आकर्षित करते. दृक-श्राव्य स्वरुपात दैनंदिन जीवनात जाहिरातींसाठी अनेक माध्यमं वापरली आहेत. त्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी माहितीवर असणारी ही जाहिरातींची वाक्ये एकमेकानंतर गुंफणे कवीने त्याला कविता वाङ्मय प्रकारात सादर केले. याला कविता म्हणावी की नाही, हा मोठा मुद्दा आहे.

गद्यात्मकतेकडे झुकणारी जाहिरातीची भाषा सरळपणे वाक्यची वाक्ये तयार करते. ही वाक्ये कवितेचा नवा आकृतीबंध तयार करतात. कवी मनवरांची 'बुरशी लागलेल्या कविता भेट देता येतील' इथपासून ते नागराज मंजुळेच्या कवितेपर्यंत जाहिरातीची कविता तयार झालेली दिसते.

**संगणकीय भाषा**

संगणकीय भाषांचा वापर १९९० नंतरच्या सर्वच कवींनी केलेला जाणवतो. नुसती मंगेश काळे यांच्या 'शक्तीपाताचे सूत्र' या कवितासंग्रहातील काही कवितांतील हे शब्द आहेत. उदा. www.com, एन्टर, ओपन, कॉम्प्युटर, ऑफ, रीसेट, प्लीकेशन, कीबोर्ड, स्कॅन, क्लीक, प्रिंटर, मेमरी, फाईल, हार्डडिस्क, व्हायरस, डाटा, स्क्रीन, री वशन, टोनर, रीफील, मेमरी, प्रिंट, साईट, ऑपरेटर, रिमेक, डार्क, डाटा... इत्यादी शब्द यांच्या कवितेत सहजपणे येतात.

ISSN 2321-4953 (Online)
February - 2018

**भ्रमणध्वनीची भाषा**

भ्रमणध्वनीला परमेश्वर मानणा-या जगात कवी भ्रमणध्वनीशी संबंधित असणा-या सांकेतिक किंवा कोडभाषेचा सहजपणे कवितेत वापर करतो. सध्या तर दैनंदिन जीवनात देखील बोलताना या शब्दांचा सहजपणे वापर केलेला दिसतो.

"Solanki, boss is calling you, where are you now?

Contact immediately71"

(मंगेश काळे : ततपप: पृ.३८)

**निष्कर्ष**

१. भाषा हा कवितेचा प्राण आहे. जागतिकीकरणाचा परिणाम भाषेवर झालेला आहे. जागतिकीकरणाची भाषा इंग्रजी असल्यामुळे ब-याच कवितांमध्ये इंग्रजी आणि हिंदी सारख्या संमिश्र शब्दांचा जास्तीत जास्त वापर या कवितांत दिसून येतो. जागतिकीकरणाचे चित्रण करणारी कविता भाषेची मोडतोड करते. व्याकरणिक नियम धुडकावून लावते. व्यावसायिक शब्दाबरोबर क्षेत्रसंबंधित शब्दांची भाषा कवितेत दिसून येते.

२. जागतिकीकरणाचे चित्रण करणा-या कवितांवर प्रसारमाध्यमांचा जबरदस्त परिणाम झालेला दिसून येतो. उदा. मोबाईलची भाषा, जाहिरातीची भाषा, नव्या चित्रपटाची आणि गाण्याची भाषा, दूरदर्शन मालिकांच्या पटकथेतील शब्द आणि संवाद, संगणकाची भाषा, वर्तमानपत्राची भाषा , दैनंदिन वापरातील भाषा आणि शब्द सहजपणे कवितेत वावरताना दिसतात.

३. संगणकीय शब्दाने आजची भाषा ओतप्रोत भरलेली आहे.. 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा', 'बॅटरीच आऊटडेटेड झालीय आपली, म्हणून होत नाही आपला दिवस स्टार्ट', 'www हे विश्वची माझा कटोरा, 'घाणेरड्या चित्रांनी भरलेल्या करप्ट फ्लॉपीसारख्या माझा आत्मा करप्ट झालाय, 'काहीच प्रिंट होत नसणा-या दिवसापासून, फायबर ग्लासातून सायबर न्याहाळणारी नजर नपुंसक जगावर घालते दगड, 'सिझर कर म्हणतेय माती', ग्लोबल एरिया नेटवर्कमध्ये मी मात्र कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर, बॅलन्स आणि बॅटरी संपलेल्या मोबाईलसारखी बिनकामाची माणसं' 'सा-या विश्वाला पेस्ट कंट्रोल करायला निघालेय मी, या ओळी वाचल्यानंतर वाचक भांबावून जातो. हे नवे काव्यभान आणि भाषाभान कवितेच्या शैलीबद्दल विचार करायला भाग पाडते. ही भाषा परंपरागत, संस्कृतप्रचूर किंवा कुणाचे अनुकरण करणारी भाषा ते वापरत नाही. ही संकरीत शैली लक्ष वेधून घेते. शैलीशास्त्रीय अभ्यासकाच्या पुढे या भाषेने फार मोठे आव्हान उभे केले आहे.

४. या कवितासंग्रहात अनेक चित्रांचा वापर केला आहे. या कवितांची शीर्षके ही समर्पक आहेत. परंतु कवितासंग्रहातील अर्पणपत्रिका नव्या शोषकव्यवस्थेचे आणि समाजव्यवस्थेचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.

**आधारभूत ग्रंथ**

१. 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य', (संपा.) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, सायन पब्लिकेशन प्रा.लि., पुणे' (आ. पहिली) - २०१७